१०३/२०२२/१५२

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक लेखा अधिकारी संवर्गातील अधिका-यांना लेखाधिकारी या पदावर पदोन्नतीने सुधारीत पदस्थापना देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन आदेश क्रमांक : संलेको-२०२२/प्र.क्र.११९/कोषा. प्रशा.२**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५.११.२०२२.

संदर्भ :- शासन आदेश क्र. संलेको-२०१२१/प्र.क्र.१७७/कोषा. प्रशा.२, दिनांक १८.०५.२०२२.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक लेखा अधिकारी संवर्गातील खालील विवरणपत्रात नमूद अधिका-यांना संदर्भाधिन शासन आदेश दिनांक १८.०५.२०२२ अन्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) संवर्गात लेखा अधिकारी या पदावर ते त्या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नतीने स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या महसूली विभागीय संवर्ग वाटपानुसार स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. खालील नमूद अधिकाऱ्यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या दि.१८.०५.२०२२ रोजीच्या आदेशातील अटींच्या अधिन राहून, सदर आदेशात अंशत: बदल करुन त्यांची स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या महसूली विभागांतर्गत स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारीत पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | वाटप केलेला महसूल विभाग | शासन आदेश दि.१८.०५.२०२२ अन्वये पदोन्नतीने देण्यात आलेले पदस्थापनेचे पद व कार्यालय | सुधारीत पदस्थापना व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. निवृत्ती ज्ञानोबा पाटील | पुणे (सुट) | अप्पर कोषागार अधिकारी,कोषागार कार्यालय,कोल्हापूर | लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर |
| २ | श्री.विशाल तेजराम मानकर | नागपूर | लेखा अधिकारी, उपसंचालक,व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण कार्यालय,नागपूर | लेखा अधिकारी, जलजीवन मिशन, चंद्रपूर |
| ३ | श्री.अंजन ननीगोपाल रॉय चौधरी | नागपूर | लेखा अधिकारी,पोलीस आयुक्तालय,नागपूर | अप्पर कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय,वर्धा, |
| ४ | श्री.नंदकिशोर निवृत्ती अंजाण | औरंगाबाद | लेखा अधिकारी (शिक्षण),शिक्षण विभाग,बीड | लेखा अधिकारी, जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय, बीड |
| ५ | श्री.रविंद्र दिनेश काजळकर | नाशिक | लेखा अधिकारी (शिक्षण), शिक्षण विभाग,अहमदनगर | लेखा अधिकारी, जलजीवन मिशन, धुळे |
| ६ | श्री.रत्नाकर पुरुषोत्तम पागोटे | नागपूर (सुट) | लेखा अधिकारी (संगणकीकरण),सहसंचालक, लेखा व कोषागारे,नागपूर | लेखा अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय,नागपूर |

१५/११

२. सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/०४/२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत,सामान्य प्रशासन विभाग,दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार तसेच सामान्य प्रशासन विभाग,दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णय प्रकरणी मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे आव्हाण देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधिन उपरोक्त अधिका-यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पूरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

३. सदरचे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्यामूळे ती आयोगाच्या मान्यतेने नियमित करण्यात येईल.

४. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार त्वरीत स्विकारावा व कार्यभार स्विकारल्याबाबतचा अहवाल या विभागास तसेच संचालक,लेखा व कोषागारे,मुंबई यांचेकडे त्वरीत पाठविण्यात यावा. ३० दिवसांच्या आत पदोन्नतीच्या पदावरील पदस्थापना न स्वीकारल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील.

५. उपरोक्त अधिकाऱ्यांना शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/कार्या.१२, दि.२८ एप्रिल २०१५, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२, दि.१६ जूलै २०१५ व शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.११४/कार्या.१२, दिनांक १५ जून, २०१७ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

६. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१६/२/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रतिनियुक्तीच्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना दर्शविण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

//पवार

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव, वित्त विभाग**

**प्रति,**

१. महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर. *
२. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
४. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
५. अ.मु.स.(ले. व को.) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. संबंधित अधिका-यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
७. संबंधित अधिका-याचे पदोन्नतीने पदस्थापना झालेल्या कार्यालयाचे प्रमुख*
८. संबंधित अधिकारी*
९. निवडनस्ती कोषा प्रशा-२ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(* संचालक, ले व को, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)